राज्यसेवा सामान्य अध्ययन - २ (GS-2)

भारतीय संविधान व भारतीय राजकारण आणि कायदे

टॉपिक

# संपूर्ण घटनादुरूस्त्या

## संपूर्ण अभ्यासक्रमावर आधारित १ ते १०४ पर्यंतच्या घटना दुरूस्त्यांची अध्ययावत माहिती


* लेखन व संकलन *

समाधान कोकाटे सर

(M.A.Pol.Sci.)

- राज्यव्यवस्था मार्गदर्शक, पुणे

Telegram link - @polity194

9511652856

# मनोगत

**नमस्कार विद्यार्थी मित्रांनो**

प्रत्येक विषयाची म्हणून एक विशिष्ट परिभाषा असते. ही परिभाषा आत्मसात करता आली की, कोणत्याही विषयाचा अभ्यास अगदी सोपा होऊन जातो. राज्यव्यवस्था (Polity) बाबतीत बोलायचे झाल्यास प्रश्न विचारण्याचे प्रमाण अतिशय गुंतागुंतीचे व परीक्षेची काठिण्यपातळी वाढवणारे होत चालले आहे.

आयोगाच्या पाठीमागील प्रश्नपत्रिकांचे विश्लेषण केले असता असे दिसुन येत आहे की आयोग महत्वाच्या घटनादुरुस्त्यांची अभ्यासक्रमाबरोबर सांगड घालुन प्रश्न विचारत आहे. (उदा. : उपराष्ट्रपतींची निवड पद्धतीबाबतची 11 वी घटनादुरुस्ती यावर राज्यसेवा पूर्व 2019 मध्ये प्रश्न विचारण्यात आला होता.) तुम्ही आयोगाच्या प्रश्नपत्रिकांचे विश्लेषण केले असता असे अनेक प्रश्न दिसुन येतील.

यावर उपाय म्हणुन आपण 1 ते 104 पर्यंतच्या घटनादुरुस्त्यांची अभ्यासक्रमाबरोबर सांगड घालुन दिलेली आहे. याचा तुम्हाला नक्कीच फायदा होईल. माझी विद्यार्थी मित्रांना विनंती आहे, राज्यव्यवस्थेचा अभ्यास करत असताना याची प्रत (Copy) कायम सोबत ठेऊन या प्रत्येक घटनादुरुस्तीला अभ्यासक्रमासोबत लिंक करुन अभ्यासा.

इथुन पुढे विद्यार्थी मित्रांच्या मागणीचा आदर करुन जास्तीत जास्त परिक्षाउपयोगी अभ्यास साहित्य उपलब्ध करुन देण्याचा प्रयत्न असेल, आगामी परिक्षांसाठी सर्व विद्यार्थी मित्र-मैत्रीणींना मनापासुन शुभेच्छा-----!

By- **समाधान बाबुराव कोकाटे**
राज्यव्यवस्था मार्गदर्शक, पुणे
संपर्क : 9511652856

SAMADHAN KOKATE (POLITY)

## ❊ पहिली घटनादुरुस्ती अधिनियम – 1951
### दुरुस्त्या :

- ➢ सामाजिक आर्थिक मागासवर्गाच्या विकासासाठी विशेष तरतुदी करण्याचा अधिकार राज्यसंस्थाला देण्यात आला.
- ➢ कलम 31A व 31B या दोन नवीन कलमांचा घटनेत समावेश आहे.
- ➢ भुसुधारणा व इतर कायद्यांचे न्यायालयीन पुनर्विलोकनापासुन (Judicial Review) संरक्षण करण्याच्या उद्देशाने परिशिष्ट क्रमांक 9 चा नव्याने घटनेत समावेश.
- ➢ भाषण व अभिव्यक्तीस्वातंत्र्यावर 19 (1) नवे 3 निर्बंध घालण्यात आले.
  1) सार्वजनिक सुव्यवस्था (Public order)
  2) परदेशी राष्ट्रांशी मैत्रीपूर्ण संबंध
  3) गुन्ह्यास प्रोत्साहन देणे.
  (टिप : हे निर्बंध वाजवी व न्यायप्रविष्ट असतील)
- ➢ राज्यसंस्थेने कोणताही व्यापार किंवा उदयोगाचे राष्ट्रीयीकरण करणे यामुळे व्यापार अथवा व्यवसाय करण्याच्या मुलभूत हक्काचे उल्लंघन होते, या कारणावरून ते अवैध होणार नाहीत.

## ❊ दुसरी घटनादुरुस्ती अधिनियम – 1952

- ➢ लोकसभेचा एक सदस्य (खासदार) 7.5 लाखापेक्षा जास्त लोकांचे प्रतिनिधित्व करु शकतो.

## ❊ तिसरी घटनादुरुस्ती अधिनियम – 1954

- ➢ सार्वजनिक हिताच्या दृष्टीने संसद पुढील बाबी नियंत्रित करु शकते.
  उदा.: अन्नधान्य, गुरांचा चारा, कापूस बियाने, कच्चा कापूस आणि कच्चा ताग यांचे उत्पादन, पुरवठा व वितरण.

म्हणजेच : घटनादुरुस्तीने परिशिष्ट 7 मधील समवर्ती सुचीतील विषय क्रमांक 33 पुनर्स्थापित करण्यात आला.

## ❊ चौथी घटनादुरुस्ती अधिनियम – 1955
### दुरुस्त्या :

- ➢ राज्यसंस्था कोणत्याही व्यापाराचे राष्ट्रीयीकरण करु शकते.
- ➢ कलम 31 (A) ची व्याप्ती अजुन वाढवण्यात आली.
- ➢ खाजगी मालमत्ता सक्तीने अधिग्रहीत केल्यानंतर दिल्या गेलेल्या नुकसानभरपाईच्या प्रमाणाचे न्यायिक पुनर्विलोकन केले जाणार नाही.
- ➢ कलम 305 मध्ये दुरुस्ती (राज्य मक्तेदारी कायद्यांचे समर्थन)

## ❊ पाचवी घटनादुरुस्ती अधिनियम – 1955
### दुरुस्त्या :

❊ **कलम 3 मध्ये दुरुस्ती :** राज्याचे क्षेत्र–सीमा व नाव यांच्यावर परिणाम करणाऱ्या प्रस्तावीत केंद्रीय कायद्यावर राज्यांचे मत व्यक्त करण्यासाठी कालावधीची मर्यादा राष्ट्रपती निश्चित करु शकतात.

## ❊ 6 वी घटनादुरुस्ती अधिनियम – 1956
### दुरुस्त्या :

- ➢ कलम 269 संदर्भात महत्वपूर्ण बदल करण्यात आला.
- ➢ आंतरराज्यीय व्यापार व वाणिज्यामधील वस्तुंच्या खरेदी–विक्रीवर कर लावणे हा नवीन विषय केंद्रसुचीमध्ये समाविष्ट करण्यात आला. आणि याबाबत राज्याचे आधिकार 92 (C) मर्यादित करण्यात आले.

## ❊ 7 वी घटनादुरुस्ती अधिनियम – 1956
### दुरुस्त्या :

1) 1950 च्या मुळ घटनेतील राज्यांचे विभाजन 4 गटात

SAMADHAN KOKATE (POLITY)

करण्यता आले होते. हे 4 गट (अ, ब, क, ड) मिळून 29 राज्य निर्माण करण्यात आली होती. या घटनादुरुस्तीने हे राज्याचे चार गटातील विभाजन (4 Fold Division) रद्द करुन 14 घटकराज्ये आणि 6 केंद्रशासित प्रदेशांची निर्मिती केली. (अर्थातच राज्य पुनर्रचना आयोग शिफारशी, अन्वये.)

- 14 घटकराज्ये : आंध्र, आसाम, बिहार, बॉम्बे, J & K, केरळ, मध्यप्रदेश, मद्रास म्हैसुर, ओरिसा, पंजाब, राजस्थान, UP, पं.बंगाल.
- 6 केंद्रशासित प्रदेश : अंदमान ॲण्ड निकोबार बेटे, लक्षद्विप बेटे (लॅकडिव्ह, मिनीकॉय, अमिनदिवी) दिल्ली, हिमाचलप्रदेश, त्रिपुरा, मणिपुर.

2) उच्च न्यायालयाचे अधिकारक्षेत्र केंद्रशासित प्रदेशांना लागू केले.

3) दोन किंवा अधिक राज्यांसाठी संयुक्त उच्च न्यायालयाची स्थापना.

4) उच्च न्यायालयात अतिरिक्त (Additional) आणि तात्पुरत्या (Acting)
न्यायाधिशांची नियुक्ती करणे.

## ❇ 8 वी घटनादुरुस्ती अधिनियम – 1960

- **कलम 334 मध्ये दुरुस्ती :** SC व ST तसेच ॲग्लोइंडियन समुदायासाठी जागाचे आरक्षण कालावधीत 10 वर्षांनी वाढ म्हणजे आरक्षणाचा कालावधी 1970 पर्यंत वाढवला.

## ❇ 9 वी घटनादुरुस्ती अधिनियम – 1960

- बेरुबारी युनियन म्हणुन ओळखला जाणारा प्रदेश पाकिस्तानला बहाल करणे सोपे करण्यात आले. (वरील बद्दल कलम 3 अंतर्गत नसुन यासाठी कलम 368 नुसार संसदेने घटनादुरुस्ती केली गेली.)

## ❇ 10 वी घटनादुरुस्ती अधिनियम – 1961

- दादरा नगर हवेलीचा भारतीय संघराज्यक्षेत्रामध्ये समावेश करण्यता आला.

(प्रशासनव्यवस्था म्हणुन कलम 240 व परिशिष्ट 1 मध्ये दुरुस्ती)

## ❇ 11 वी घटनादुरुस्ती अधिनियम – 1961 दुरुस्त्या :

1) उपराष्ट्रपती निवडणूक पद्धतिमध्ये (कलम 66) बदल करुन संसदेच्या संयुक्त बैठकीऐवजी सध्याची निर्वाचन मांडळाची तरतुद.

2) राष्ट्रपती व उपराष्ट्रपती यांच्या निवडणूकी वेळेस निर्वाचक गण अपूर्ण होते. या कारणास्तव यांच्या निवडणूकीला आव्हाण देता येणार नाही. (कलम 71)

## ❇ 12 वी घटनादुरुस्ती अधिनियम – 1962

- गोवा, दमण आणि दीव यांचा भारतीय संघराज्यक्षेत्रात समावेश. (कलम 240 मध्ये दुरुस्ती)

## ❇ 13 वी घटनादुरुस्ती अधिनियम – 1962

- नागालँडला राज्याचा दर्जा देण्यात येऊन त्यासाठी विशेष तरतुदी करण्यासाठी 371 A हे नवे कलम समाविष्ट करण्यात आले.

## ❇ 14 वी घटनादुरुस्ती अधिनियम – 1962

- पुदुच्चेरीचा केंद्रशासित प्रदेश म्हणून भारतीय संघराज्यक्षेत्रामध्ये समावेश केला.
- संसदीय कायद्याद्वारे पुढील केंद्रशासित प्रदेशांसाठी विधिमंडळाची तरतूद
(हिमाचल प्रदेश, मणिपूर, त्रिपुरा, गोवा, दमण आणि दीव तथा पुदुच्चेरी)

## ❇ 15 वी घटनादुरुस्ती अधिनियम– 1963 दुरुस्त्या :

1) उच्च न्यायालयातील न्यायाधीशांचे निवृत्ती वय 60 वर्षांवरुन 62 वर्षापर्यंत वाढविण्यात आले.

2) उच्च न्यायालयाच्या निवृत्त न्यायाधिशांची त्याच न्यायालयाचे हंगामी/प्रभारी (Acting Judges) न्यायाधिश नियुक्तीची तरतूद.

SAMADHAN KOKATE (POLITY)

# राज्यव्यवस्था

## ऑनलाईन/ऑफलाईन स्पेशल बॅच

## Online बॅच सुरू

### Online बॅच वैशिष्ट्ये

१) डिजीटल इंटरॲक्टिव बोर्डद्वारे राज्यव्यवस्थेची प्रभावी मांडणी.
२) प्रत्येक घटकावर सराव+आयोगाचे प्रश्न सोडवून घेणार
३) एकूण ६०+ तासाहून अधिक रेकॉर्डेड लेक्चरर्स
४) कोर्स कालावधी ६ महिने (प्रत्येक व्हिडीओ ५ वेळेस पाहता येईल)
५) १००% हस्तलिखित नोटस्
६) तौलनिक सिद्धांताच्या आधारे संपूर्ण अभ्यासक्रमाची प्रभावी मांडणी

Play Store वरून Download करा Samadhan Kokate Polity app

## प्रत्येक महिन्याला Offline बॅच (पुणे येथे)

### Offline बॅच वैशिष्ट्ये

१) आयोगाच्या ६०+ प्रश्नपत्रिकांचे वर्गातच विश्लेषण करून घेणारा एकमेव क्लास
२) शिकवलेल्या प्रत्येक घटकावर स्वतंत्र सराव टेस्ट
३) संपूर्ण राज्यव्यवस्थेचा अभ्यासक्रम Line to line शिकविणारा एकमेव क्लास
४) १००% हस्तलिखित नोटस्

राज्यसेवा मुख्य GS-2 स्पेशल बॅच उपलब्ध

ASO मुख्य स्पेशल राज्यव्यवस्था बॅच उपलब्ध

## मार्गदर्शक : समाधान कोकाटे सर
(M.A.Pol.Sci.)

9511652856 / 8600960738 | Telegram link - @polity194

3) एका उच्च न्यायालयातुन दुसऱ्या उच्च न्यायालयात बदली झालेल्या न्यायाधीशांना भरपाई भत्ता (Compensatory allowance) देण्याची तरतूद.

4) उच्च न्यायालयातील सेवानिवृत्त न्यायाधिशांची सर्वोच्च न्यायालयाचे हंगामी न्यायाधीश (Adhoc Judge) म्हणून काम करण्याची तरतूद.

5) कलम 226 चाही विस्तार करण्यात आला. या दुरुस्तीनुसार उच्च न्यायालये त्यांच्या अधिकार क्षेत्रात घडलेल्या करणांसाठी त्यांच्या अधिकारक्षेत्राबाहेरील व्यक्ती किंवा प्राधिकारणाला (Authority) प्राधिलेख काढण्याचे अधिकार देऊ शकते.

### ❊ 16 वी घटनादुरुस्ती अधिनियम – 1963 दुरुस्त्या :

1) कलम 19 भाषण व अभिव्यक्तीचे स्वातंत्र्य, शांततापुर्वक आणि नि:शत्र एकत्र येणे. व संस्था स्थापन करण्याच्या हक्कांवर भारताचे सार्वभौमत्व व अखंडतेच्या दृष्टीकोनातुन पर्याप्त बंधने घातली जाऊ शकतील.

2) परिशिष्ट 3 मधील शपथेच्या तरतुदीमध्ये ''अखंडता व सार्वभौमत्व हे दोन शब्द नव्याने समाविष्ट करण्यात आले.

### ❊ 17 वी घटनादुरुस्ती अधिनियम – 1964

➢ कलम 31अ मध्ये दुरुस्ती करुन, बाजारभावाप्रमाणे मोबदला दिल्याखेरीज लागवडीखाल शेतजमीन अधिग्रहन करण्यास बंदी.

### ❊ 18 वी घटनादुरुस्ती अधिनियम – 1966 दुरुस्त्या :

➢ कलम 3 मध्ये दुरुस्ती करण्यात आली.

➢ कलम 3 नुसार संसदेला प्रदान केलेल्या अधिकारांमध्ये कोणत्याही राज्याचा किंवा केंद्रशासित प्रदेशाचा एखादा भाग दुसऱ्या कोणत्याही राज्याला किंवा केंद्रशासित प्रदेशाला जोडून नवीन राज्य किंवा नवीन केंद्रशासित प्रदेश बनविण्याचा अधिकार प्रदान करण्यता आला.

➢ याद्वारे कलम 3 नुसार ''राज्य'' या शब्दामध्ये केंद्रशासित प्रदेश या शब्दाचाही समावेश होते हे स्पष्ट करण्यात आले.

### ❊ 19 वी घटनादुरुस्ती अधिनियम – 1966

➢ कलम 324 मध्ये दुरुस्ती

➢ निवडणूक न्यायाधिकरण (Election Tribunals) ही व्यवस्था रद्द करुन निवडणूक याचिकांची सुनावणी करण्याचा अधिकार उच्च न्यायालयांना देण्यात आला.

### ❊ 20 वी घटनादुरुस्ती अधिनियम – 1966

➢ नवीन कलम 233 A चा घटनेत समावेश

➢ सर्वोच्च न्यायालयाने चंद्रमोहन विरूद्ध उत्तर प्रदेश केसमध्ये रद्द ठरविलेल्या काही जिल्हा न्यायाधीशांच्या (UP) नियुक्तीला मान्यता देण्यात आली. (राज्यपालद्वारा नियुक्ती)

### ❊ 21 वी घटनादुरुस्ती अधिनियम – 1967

➢ मुळ परिशिष्ट 8 मधील 14 भाषांमध्ये ''सिंधी'' या नव्या भाषेचा समावेश करण्यात आल्याने त्यांची संख्या 15 झाली.

### ❊ 22 वी घटनादुरुस्ती अधिनियम – 1969

➢ आसाम राज्यांतर्गत एक नवीन स्वायत्त राज्य ''मेघालय'' स्थापन करणे.

### ❊ 23 वी घटनादुरुस्ती अधिनियम – 1969

➢ SC, ST व ॲग्लोइंडियन यांचे जागांचे आरक्षण याचा कालावधी 1980 पर्यंत वाढवला (कलम 334 मध्ये बदल)

### ❊ 24 वी घटनादुरुस्ती अधिनियम – 1971 दुरुस्त्या :

➢ संसद मुलभूत हक्कांसह घटनेच्या कोणत्याही भागात दुरुस्ती करू शकते अशी तरतुद करण्यात आली. (कलम 13 मध्ये दुरुस्ती)

SAMADHAN KOKATE POLITY

- घटनादुरुस्ती विधेयकाला संमती देणे राष्ट्रपतींवर बंधनकारक केले गेले.
- वरील घटनादुरुस्ती संसदेद्वारा गोलखनाथ खटल्यास प्रत्युत्तर होते.

### ❊ 25 वी घटनादुरुस्ती अधिनियम–1971 दुरुस्त्या :

- मालमत्तेचा हक्क हा मुलभूत हक्क म्हणून मर्यादित (Curtailed) करण्यात आला.
- मालमत्तेच्या अधिकारामध्ये ''भरपाई'' ऐवजी रक्कम हा शब्द समाविष्ट करण्यात आला.
- मार्गदर्शक तत्व 39 (B) व 39 (C) च्या अंमलबजावणीसाठी लागू केलेल कायदे कलम–14, 19 व 31 ने हमी दिलेल्या हक्कांचे उल्लंघन करतात म्हणून त्यांना न्यायालयामध्ये आव्हाण दिले जाणार नाही.
- कलम–31 (C) चा नव्याने समावेश करण्यात आला.

### ❊ 26 वी घटनादुरुस्ती अधिनियम – 1971

- माधवराव केस मधील सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयामुळे ही घटनादुरुस्ती पारित करण्यात आली.
- भारतीय संस्थानिकांचे ''तनखे व विशेषाधिकार (Privy purses and privileges) रद्द करण्यात आले.

### ❊ 27 वी घटनादुरुस्ती अधिनियम – 1971

- काही केंद्रशसित प्रदेशांच्या प्रशासकांना वटहुकूम काढण्याचा अधिकार प्रदान करण्यात आला (कलम–239B)
- मणिपूर राज्यासाठी विधानसभा व मंत्रीमंडळ निर्माण करण्याचा अधिकार संसदेला देण्यात आला.

### ❊ 28 वी घटनादुरुस्ती अधिनियम – 1972

- भारतीय नागरी सेवेतील अधिकाऱ्यांचे (Icsofficers) विशेषाधिकार रद्द करण्यात आले.
- संसदेला त्यांच्या सेवाशर्ती ठरविण्याचे अधिकार देण्यात आले.

### ❊ 29 वी घटनादुरुस्ती अधिनियम – 1972

- जमीनसुधारणेबाबतचे केरळ सरकारच्या 2 कायद्यांना 9 व्या परिशिष्टामध्ये स्थान देण्यात आले.

### ❊ 30 वी घटनादुरुस्ती अधिनियम – 1972

- कलम–133 मध्ये दुरुस्ती (दिवाणी प्रकरणांमध्ये सर्वोच्च न्यायालयाचे अपिलक्षेत्र.)

### ❊ 31 वी घटनादुरुस्ती अधिनियम – 1972 दुरुस्त्या :

- लोकसभेतील राज्यांचे जास्तीत जास्त प्रतिनिधित्व 500 वरुन 525 इतके वाढवण्यात आले तर केंद्रशासित प्रदेशांचे लोकसभेतील जास्तीत जास्त प्रतिनिधित्व 25 वरून 20 पर्यंत कमी करण्यात आले.
- म्हणजेच भारतातील एकुण लोकसभेतील सदस्यसंख्या 525 वरून 545 इतकी करण्यात आली.

### ❊ 32 वी घटनादुरुस्ती अधिनियम – 1973 दुरुस्त्या :

- कलम–371 (D) चा समावेश.
- आंध्रप्रदेशातील तेलंगणा विभागासाठी विशेष तरतुदी करण्यात आल्या.
- लोकसेवा संबंधित तक्रारींची सुनावणी करण्यासाठी प्रशासनिक न्यायाधीकरणाची स्थापना करण्यात आली.
- आंध्रप्रदेश केंद्रीय विश्वविद्यालय स्थापन करणे. (कलम–371E)

### ❊ 33 वी घटनादुरुस्ती अधिनियम – 1974

- कलम–101 आणि 190 मध्ये दुरुस्ती करण्यात आली, ज्यामध्ये संसद किंवा विधीमंडळ सदस्याने दिलेले राजीनामे स्वत:च्या मर्जीने दिले आहेत की नाही, याबाबत सभापती/अध्यक्षांची खात्री झाल्यानंतरच तो राजीनामा स्विकारेल अन्यथा नाही, अशी तरतुद करण्यात आली.

## ❋ 34 वी घटनादुरुस्ती अधिनियम – 1974

➢ परिशिष्ट 9 मध्ये आणखी वीस जमीनसुधारणा कायद्यांचा समावेश

## ❋ 35 वी घटनादुरुस्ती अधिनियम – 1974

1) सिक्कीम राज्याला भारतीय संघराज्याचे सहयोगी राज्याचा दर्जा देण्यात आला (कलम–2A)
2) परिशिष्ट 10 नव्याने घटनेत समाविष्ट करुन ज्यामध्ये सिक्कीमबाबत अटी व नियमांची तरतूद देण्यात आली.

## ❋ 36 वी घटनादुरुस्ती अधिनियम – 1975

➢ सिक्कीमला भारतीय संघराज्यातील पुर्ण राज्याचा दर्जा देण्यात येऊन त्याला परिशिष्ट 1 मध्ये समाविष्ट करण्यात आले.

➢ कलम–2 A आणि परिशिष्ट 10 रद्द करण्यात आले.

## ❋ 37 वी घटनादुरुस्ती अधिनियम – 1975

➢ कलम–240 मध्ये सुधारणा करुन अरूणाचल प्रदेश या केंद्रशासित प्रदेशासाठी विधानसभा व मंत्रीमंडळाची व्यवस्था करण्यात आली.

## ❋ 38 वी घटनादुरुस्ती अधिनियम– 1975 दुरुस्त्या :

➢ राष्ट्रपती, राज्यपाल व केंद्रशासित प्रदेशातील प्रशासक यांनी काढलेले वटहुकूम न्यायालयात आव्हानीत केले जाणार नाहीत. (कलम–123 व 213)

➢ राष्ट्रपतीने केलेल्या आणिबाणीच्या घोषणेविरूद्ध न्यायालयात जाता येणार नाही. (कलम–352)

➢ एकाच वेळी वेगवेगळ्या कारणांसाठी राष्ट्रीय आणीबाणीच्या एकापेक्षा अधिक घोषणा करण्याचे अधिकार राष्ट्रपतींना देण्यात आले.

उदा. 1971 मध्ये PAK.आक्रमणावरुन तर 1975 मध्ये अंतर्गत अशांतता या कारणावरुन देशात राष्ट्रीय आणीबाणींची घोषणा करण्यात आली होती दोन्हींना 1977 मध्ये एकाचवेळी समाप्त करण्यात आले. (उदा. फक्त समजण्यासाठी आहे.)

## ❋ 39 वी घटनादुरुस्ती अधिनियम – 1975

➢ राष्ट्रपती, उपराष्ट्रपती, पंतप्रधान आणि लोकसभा अध्यक्ष यांच्या निवडणुकीसंबंधातील विवाद न्यायालयाच्या अधिकारक्षेत्राबाहेर ठेवण्यात आले. (याबाबतचे निर्णय संसद ठरवील ते प्राधिकरण होईल.)

## ❋ 40 वी घटनादुरुस्ती अधिनियम – 1976

➢ भारताचे जलक्षेत्र, भूक्षेत्र (Continental Shelf), आर्थिक क्षेत्र (EEZ) आणि समुद्री क्षेत्र निश्चित करण्याचे अधिकार संसदेला देण्यात आले.

## ❋ 41 वी घटनादुरुस्ती अधिनियम – 1976

➢ राज्यलोकसेवा आयोग (SPSC) आणि संयुक्त लोकसेवा आयोगांच्या (JPSC) सदस्यांचे निवृत्तीचे वय 60 वरुन 62 वर्षे करण्यात आले. (कलम–316 मध्ये सुधारणा.)

## ❋ 42 वी घटनादुरुस्ती अधिनियम – 1976

➢ अंमलबावणी : 2 नोव्हेंबर 1976

➢ लघुराज्यघटना (Mini Constitution) अशी ओळख.

दुरुस्त्या :

➢ **प्रस्तावना :** समाजवादी, धर्मनिरपेक्ष व एकात्मता या 3 शब्दांचा समावेश.

❋ **मुलभूत कर्तव्य :** भाग–4A मध्ये कलम–51A चा समावेश करुन 10 मुलभूत कर्तव्यांचा समावेश.

➢ नवीन मार्गदर्शक तत्वांचा समावेश कलम–39(f), 39(A), 43(A), 48(A)

➢ मार्गदर्शक तत्वांच्या अंमलबजावणी केलेले कायदे, मुलभूत हक्कांचे उल्लंघन करतात या कारणावरुन न्यायालये त्यांना अवैध ठरवू. शकत नाही.

❋ **आणीबाणी विषयक तरतुदी :**

1) भारताच्या कोणत्याही भागामध्ये राष्ट्रीय आणीबाणीची घोषणा करणे सुकर केले.
2) घटकराज्यातील राष्ट्रपती राजवटीचा एकवेळ (सलग) कालावधी 6 महिन्यावरुन 1 वर्ष करण्यात आला.

SAMADHAN KOKATE (POLITY)

3) कायदा व सुव्यवस्थेची गंभीर परिस्थिती हाताळण्यासाठी कोणत्याही राज्यात सशस्त्र सैनिक दल पाठविण्याचे अधिकार केंद्राला देण्यात आले.

✻ **इतर दुरुस्त्या :**

➢ लोकसभा व विधानसभा यांचा कार्यकाळ 5 वरुन 6 वर्षे करण्यता आला.

➢ भाग-14 A (शिर्षक 'न्यायाधिकरणे') समाविष्ट करण्यात आला.

➢ घटनादुरुस्तीला न्यायिक पुनर्विलोकनाच्या कक्षेबाहेर ठेवण्यात आले.

➢ राज्यसुचीतील 5 विषय समवर्ती सुचीमध्ये स्थानांतरीत करण्यात आले.

1) शिक्षण 2) वने

3) वन्यपशू व पक्षी यांचे संरक्षण

4) वजन व मापे आणि न्यायव्यवस्थेचे प्रशासन

5) सर्वोच्च न्यायालये व उच्च न्यायालये वगळता इतर सर्व न्यायालयांची स्थापना आणि संरचना.

➢ न्यायालयीन पुनर्विलोकन आणि सर्वोच्च व उच्च न्यायालयाचे आदेश अधिकार क्षेत्राचा संकोच करण्यात आला.

➢ मंत्रीमंडळाचा सल्ला राष्ट्रपतींवर बंधनकारक करण्यात आला. (असे बंधन राज्यपालांच्या बाबतीत लागू नाही.)

➢ 1971 च्या जनगणनेच्या आधारावर 2001 पर्यंत लोकसभा व विधानसभेच्या जागांची निश्चिती

➢ संसदेत व विधानसभेत गणपूर्तीची आवश्यक अट रद्द करण्यात आली.

➢ अखील भारतीय न्यायिक सेवा निर्माण करण्यता आली.

➢ प्रशासकीय न्यायासन आणि इतर विषयांसाठी न्यायासनाची तरतुद.

## ✻ 43 वी घटनादुरुस्ती अधिनियम – 1977

➢ 42 व्या घटनादुरुस्तीने समाविष्ट करण्यात आलेली पुढील कलम रद्द करण्यात आले. (कलम-32A, 131A, 144A आणि कलम-228A)

➢ देशहितविरोधी कारवाया हाताळण्याबाबत संसदेला देण्यात आलेले विशेष अधिकार काढून घेण्यात आले.

## ✻ 44 वी घटनादुरुस्ती कायदा – 1978

➢ अंमलबजावणी : 6 सप्टेंबर 1978

➢ 42 व्या घटनादुरुस्तीने केलेले जास्तीत जास्त बदल रद्द करण्यात आले.

✻ **मूलभूत हक्कांतील बदल :**

1) मालमत्तेच्या हक्काला कायदेशीर हक्काचा दर्जा देण्यात आला. (कलम-300A)

2) कलम-20 व 21 ने हमी दिलेले मुलभूत हक्क राष्ट्रीय आणिबाणी दरम्यान रद्द करता येणार नाहीत.

✻ **आणीबाणीबाबतचे बदल :**

1) राष्ट्रीय आणीबाणीसंदर्भात अंतर्गत अशांतता या शब्दाऐवजी सशस्त्र बंडाळी या शब्दांचा वापर केला गेला.

2) कॅबीनेटच्या लेखी शिफारशींनुसार राष्ट्रपती राष्ट्रीय आणीबाणी घोषित करतील.

3) राष्ट्रीय आणीबाणी समाप्तीसंदर्भात लोकसभेला अधिकार देण्यात आले, त्यापूर्वी आणीबाणीची घोषणा समाप्त करण्याचा अधिकार केवळ राष्ट्रपतींना होता.

4) कलम-19 अंतर्गतचे 6 मुलभूत स्वातंत्र्य केवळ बाह्य-राष्ट्रीयआणीबाणी दरम्यानच निलंबित करता येतील.

✻ **अध्यादेशासंदर्भात :**

➢ अध्यादेश काढण्याबाबतचे राष्ट्रपती, राज्यपाल आणि प्रशासक यांचे समाधान अंतिम असेल, अशा आशयाची तरतूद वगळण्यात आली.

✻ **इतर महत्वपूर्ण तरतुदी :**

1) लोकसभा व राज्यविधानसभेचा पाच वर्षे हा मुळ

SAMADHAN KOKATE (POLITY)

कार्यकाळ पुनर्स्थापित करण्यात आला.

2) लोकसभा आणि विधानसभा यांमध्ये गणपूर्तीच्या आवश्यकतेची तरतूद पुनर्स्थापित केली.

3) संसद आणि राज्यविधिमंडळाच्या कामकाजासंबंधी योग्य वार्ताकणास संरक्षण.

4) राष्ट्रपतींना मंत्रीमंडळाचा सल्ला एकदा पुनर्विचारार्थ पाठविण्याचा अधिकार देण्यात आला.

5) राष्ट्रपती, उपराष्ट्रपती, पंतप्रधान आणि लोकसभा सभापती यांच्या निवडणूक वादाबाबत निर्णय घेण्याचा न्यायालयाचा अधिकार काढून घेणारी तरतूद वगळण्यात आली.

6) सर्वोच्च न्यायालय व उच्च न्यायालये यांचे काही अधिकार पुनर्स्थापित केले.

## ❊ 45 वी घटनादुरुस्ती अधिनियम – 1980

➢ SC व ST यांच्यासाठी असणारे लोकसभा व विधानसभा जागांचे आरक्षण व अँग्लोइंडियन लोकांचे विशेष प्रतिनिधित्व यांचा कालावधी 10 वर्षांनी म्हणजेच 1990 पर्यंत वाढवण्यात आला. (कलम-334 मध्ये सुधारणा)

## ❊ 46 वी घटनादुरुस्ती अधिनियम – 1982

➢ आंतरराज्यीय व्यापार आणि वाणिज्य यावरील जमा कर राज्यांना देण्याची तरतूद (कलम-269 मध्ये सुधारणा)

➢ 92 (B) हा विषय केंद्रसूचीमध्ये समाविष्ट करण्यात आला.

➢ काही वस्तुंवर कराच्या दरात काही प्रमाणात समानता आणण्यात आली. (कलम-366 मध्ये सुधारणा)

## ❊ 47 वी घटनादुरुस्ती अधिनियम – 1984

➢ परिशिष्ट 9 मध्ये आणखी जमीनसुधारणाविषयक कायद्यांचा समावेश

## ❊ 48 वी घटनादुरुस्ती अधिनियम – 1984

➢ एका वर्षापेक्षा अधिक कालावधीसाठी राष्ट्रपती राजवट वाढविण्यासाठी आवश्यक असलेल्या दोन विशेष अटी पूर्ण न करताही, पंजाबमध्ये राष्ट्रपती राजवटीचा कार्यकाळ वाढवला जाईल.

## ❊ 49 वी घटनादुरुस्ती अधिनियम – 1984

➢ त्रिपुरामधील स्वायत्त जिल्हापरिषदेला घटनात्मक मान्यता देण्यात आली. (परिशिष्ट 6 मध्ये सुधारणा)

## ❊ 50 वी घटनादुरुस्ती अधिनियम – 1984

➢ गुप्तवार्ता विभागामध्ये काम करणाऱ्या व्यक्ती आणि सशस्त्रदले अथवा गुप्त माहिती विभागतील दूरसंचार यंत्रणेसंदर्भात मुलभूत हक्क मर्यादित करण्याचा अधिकार संसदेला देण्यात आला. (कलम-33 मध्ये सुधारणा)

## ❊ 51 वी घटनादुरुस्ती अधिनियम – 1984

➢ मेघालय, अरुणाचल प्रदेश, नागालँड आणि मिझोरामधील लोकसभेच्या जागांमध्ये अनुसुचित जमातींसाठी आरक्षणाची तरतूद (कलम-330 मध्ये दुरुस्ती.)

➢ मेघालय व नागालँड मधील विधानसभेच्या जागांमध्ये अनुसूचित जमातींसाठी आरक्षणाची तरतूद करण्यात आली. (कलम-332 मध्ये दुरुस्ती)

## ❊ 52 वी घटनादुरुस्ती अधिनियम – 1985

➢ ''पक्षांतर विरोधी कायदा'' म्हणूनही ओळख.

➢ संसद व राज्यविधिमंडळाचे सदस्य पक्षांतराच्या कारणावरून अपात्र ठरविण्याची तरतूद.

➢ याद्वारे नवे परिशिष्ट 10 समाविष्ट करण्यात आले.

## ❊ 53 वी घटनादुरुस्ती अधिनियम– 1986

➢ मिझोरामसाठी विशेष तरतुदी करण्यात आल्या. (कलम-371G चा नव्याने समावेश)

SAMADHAN KOKATE (POLITY)

- मिझोराम विधानसभेची किमान सदस्यसंख्या 40 निश्चित करण्यात आली.

## ❋ 54 वी घटनादुरुस्ती अधिनियम – 1986

- परिशिष्ट 2 मधील (D) मध्ये दुरुस्ती करून सर्वोच्च व उच्च न्यायालयातील न्यायाधीशांचे वेतन वाढवण्यात आले.

## ❋ 55 वी घटनादुरुस्ती अधिनियम – 1986

- अरूणाचल प्रदेश राज्यासाठी विशेष तरतुदींसाठी एक नवीन कलम–371H जोडण्यात आले.
- अरूणाचलप्रदेश विधानसभेची किमान सदस्यसंख्या 30 इतकी निश्चित करण्यात आली.

## ❋ 56 वी घटनादुरुस्ती अधिनियम – 1987

- गोवा राज्याला विशेष राज्याचा दर्जा देण्यात आला.
- गोवा विधानसभेची किमान सदस्यसंख्या 30 इतकी ठरविण्यात आली.

## ❋ 57 वी घटनादुरुस्ती अधिनियम – 1987

- कलम–332 व कलम–170 मध्ये दुरुस्ती
- अरूणाचलप्रदेश, मेघालय, मिझोराम आणि नागालँड यांच्या विधानसभेत अनुसुचित जमातींसाठी जागा आरक्षीत ठेवण्यात आल्या.

## ❋ 58 वी घटनादुरुस्ती अधिनियम – 1987

- कलम 394 A चा नव्याने समावेश
- हिंदी भाषेतील राज्यघटनेला मुळ राज्यघटनेइतकेच कायदेशीर महत्व देण्यात आले.

## ❋ 59 वी घटनादुरुस्ती अधिनियम – 1988

- पंजाबमध्ये राष्ट्रपती राजवट कालावधी 1 वर्षावरुन 3 वर्षापर्यंत वाढवण्यात आला (कलम–356 मध्ये दुरुस्ती)
- अंतर्गत अशांततेच्या कारणामुळे पंजाबमध्ये राष्ट्रीय आणीबाणीची घोषणा करण्यात आली (कलम–352 मध्ये दुरुस्ती)

## ❋ 60 वी घटनादुरुस्ती अधिनियम – 1988

- व्यवसाय, व्यापार, उपजीविका आणि रोजगार यावरील कराची मर्यादा प्रतिवर्षी 250 रु. वरुन वाढवून 2500 रु. इतकी करण्यात आली. (कलम–276 (2) मध्ये दुरुस्ती अन्वये)

## ❋ 61 वी घटनादुरुस्ती अधिनियम – 1989

- मतदारांचे वय 21 वर्ष वरून कमी करुन 18 वर्ष इतके करण्यात आले. (कलम–326 मध्ये दुरुस्ती)

## ❋ 62 वी घटनादुरुस्ती अधिनियम – 1989

- SC, ST आणि नामनिर्देशित ॲग्लो इंडियन समुदायाच्या जागाच्या आरक्षणाला आणखी 10 वर्ष म्हणजेच सन 2000 पर्यंत मुदतवाढ देण्यात आली. (कलम–334 मध्ये सुधारणा)

## ❋ 63 वी घटनादुरुस्ती अधिनियम – 1989

- पंजाबच्या संदर्भात 59 व्या घटनादुरुस्तीद्वारे केलेले बदल रद्द करण्यात आले.
- कलम 356 (5) आणि 359 (A) रद्द करण्यात येऊन आणिबाणीविषयक तरतुदीसंदर्भात पंजाबला इंतर राज्यांसमान करण्यात आले.

## ❋ 64 वी घटनादुरुस्ती अधिनियम– 1990

- पंजाबमध्ये राष्ट्रपती राजवटीचा कालावधी साडेतीन वर्ष करण्यात आला (कलम–356 मध्ये दुरुस्ती)

## ❋ 65 वी घटनादुरुस्ती अधिनियम – 1990

- कलम–338 मध्ये दुरुस्ती करुन अनुसुचित जाती व जमातींसाठी राष्ट्रीय आयोग स्थापन करण्याची व्यवस्था केली.

## ❋ 66 वी घटनादुरुस्ती अधिनियम – 1990

- परिशिष्ट 9 मध्ये आणखी 55 जमीन सुधारणा कायद्यांचा समावेश.

SAMADHAN KOKATE (POLITY)

## ❊ 67 वी घटनादुरुस्ती अधिनियम – 1990

- पंजाबमधील राष्ट्रपती राजवटीचा कालावधी साडेतीन वरुन 4 वर्ष करण्यात आला. (कलम–356 मध्ये दुरुस्ती)

## ❊ 68 वी घटनादुरुस्ती अधिनियम – 1991

- पंजाबमधील राष्ट्रपती राजवटीचा कालावधी 5 वर्ष इतका करण्यात आला.

## ❊ 69 वी घटनादुरुस्ती अधिनियम – 1991

- दिल्ली या केंद्रशासित प्रदेशास ''दिल्लीचे राष्ट्रीय राजधानी क्षेत्र'' असे संबोधण्यात येऊन त्यास विशेष राज्याचा दर्जा देण्यात आला.
- दिल्लीसाठी 70 सदस्यांची विधानसभा व 7 सदस्यीय मंत्रीमंडळ निर्मितीची तरतुद करण्यात आली.

## ❊ 70 वी घटनादुरुस्ती अधिनियम– 1992

- दिल्ली व पुदुच्चेरी विधानसभा सदस्यांचा राष्ट्रपतींच्या निर्वाचन मंडळामध्ये समावेश करण्यात आला. (कलम–54 व 55 मध्ये सुधारणा)

## ❊ 71 वी घटनादुरुस्ती अधिनियम – 1992

- परिशिष्ट 8 मध्ये तीन नवीन भाषांचा समावेश – कोकणी, मणिपुरी व नेपाळी.
  (मुळ परिशिष्टात 14 भाषा होत्या. आता त्यांची संख्या 18 झाली.)

## ❊ 72 वी घटनादुरुस्ती अधिनियम – 1992

- त्रिपुराच्या विधानसेभमेध्ये अनुसुचित जमातींसाठी काही जागा अस्थायी स्वरूपात राखून ठेवण्याची तरतुद. (कलम–332 मध्ये दुरुस्ती)

## ❊ 73 वी घटनादुरुस्ती अधिनियम – 1992

- मार्गदर्शक तत्व 40 ची अंमलबजावणी होऊन पंचायतराज संस्थाना घटनात्मक दर्जा प्राप्त झाला.
- याद्वारे ''पंचायती'' अशा शीर्षकाचा भाग 9 समाविष्ट केला.
- त्यामध्ये कलम–243 ते 243(O) या कलमांचा समावेश होतो.
- याद्वारेच पंचायतराज संबंधित 11 वे परिशिष्ट समाविष्ट करण्यता आले. ज्यामध्ये 29 विषयाचा समावेश होतो.

## ❊ 74 वी घटनादुरुस्ती अधिनियम – 1992

- याद्वारे शहरी स्थानिक संस्थांना घटनात्मक दर्जा व संरक्षण देण्यात आले.
- याद्वारे घटनेत 'नगरपालिका' असे शीर्षक असलेला नवा भाग 9(A) चा समावेश करण्यात आला.
- यामध्ये कलम–243(P) ते 243(ZG) या कलमांचा समावेश होतो.
- याद्वारे परिशिष्ट 12 (18 विषय) समाविष्ट करण्यात आले.

## ❊ 75 वी घटनादुरुस्ती अधिनियम – 1994

- भाडेकरु व मालक यांच्यातील हित, भाडे नियमन, नियंत्रण आणि भाडे कराराबद्दलच्या मुद्यासंबंधी विवादांचे निराकरण करण्यासाठी भाडे न्यायाधिकरणाची तरतूद (भाग–14 (A) मधील कलम–323 (B) मध्ये सुधारणा)
- न्यायाधिकरणाच्या निर्णयाविरुद्ध सर्वोच्च न्यायालयात अपील करण्याची सोय करण्यात आली. (कलम–136 अंतर्गत)

## ❊ 76 वी घटनादुरुस्ती अधिनियम – 1994

- तमिळनाडू आरक्षण अधिनियम 1994 चा घटनेच्या परिशिष्ट 9 मध्ये समावेश करण्यात आल्याने त्याला न्यायिक पुनर्विलोकनापासून संरक्षण प्राप्त झाले. (इंदिरा साहनी खटला 1992 आरक्षण मर्यादा 50% निश्चित)

## ❊ 77 वी घटनादुरुस्ती अधिनियम – 1995

- सरकारी नोकरीतील प्रमोशनमध्ये अनुसुचित जाती व जमातीसाठी आरक्षणाची तरतूद (कलम–16(4A) चा नव्याने समावेश करुन)

SAMADHAN KOKATE (POLITY)

- या दुरुस्तीमुळे पदोन्नतीबाबत आरक्षणाचा इंदिरा साहनी केसमधील सर्वोच्च न्यायालयाचा निर्णय रद्द झाला.

### ❋ 78 वी घटनादुरुस्ती अधिनियम – 1995

- परिशिष्ट 9 मध्ये आणखी नवीन 27 जमिन सुधारणा कायद्यांचा समावेश करण्यात आला.

### ❋ 79 वी घटनादुरुस्ती अधिनियम – 1999

- कलम–334 मध्ये सुधारणा
- अनुसुचित जाती, जमाती आणि अँग्लो इंडियन यांच्या आरक्षणाची कालमर्यादा 10 वर्षांनी वाढवली. (सन 2010 पर्यंत)

### ❋ 80 वी घटनादुरुस्ती अधिनियम – 2000

- दहाव्या वित्त आयोगाच्या शिफारशीवरुन ही दुरुस्ती पारित करण्यात आली.
- याद्वारे केंद्र व राज्य यांच्या एकुण महसुलाच्या विभागणीसाठी पर्यायी व्यवस्थेची तरतुद करण्यात आली.

### ❋ 81 वी घटनादुरुस्ती अधिनियम – 2000

- कलम–16 मधील तरतुदींना अनुसरुन अनुसुचितजाती आणि जमातीसाठी आरक्षित पदे त्याच वर्षी भरली जात नसतील तर ते पुढील वर्षामध्ये भरली जातील, अशावेळेस त्यांना त्या वर्षातील 50% पेक्षा अधिक आरक्षित पदाच्या अधिकतम सीमामध्ये समावेश केला जाणार नाही.

### ❋ 82 वी घटनादुरुस्ती अधिनियम – 2000

- केंद्र आणि राज्य लोकसेवांमध्ये अनुसुचित जाती व अनुसुचित जमातीच्या फायद्यासाठी नियुक्ती, बढतीसाठीच्या परिक्षेत आरक्षण अथवा इतर तरतुदी करण्यात येतील आणि अशा तरतुदींना कलम–335 नुसार प्रतिबंध असणार नाही.

### ❋ 83 वी घटनादुरुस्ती अधिनियम – 2000

- कलम–243M मध्ये दुरुस्ती व्यवस्था करुन अरुणाचल प्रदेशमध्ये पंचायतीत अनुसुचित जातींसाठी आरक्षण नसेल अशी तरतुद करण्यात आली.

### ❋ 84 वी घटनादुरुस्ती अधिनियम – 2001

- लोकसभा आणि राज्यविधानसभांच्या जागांची पुर्नआखणीवरील बंदी सन 2026 पर्यंत वाढवण्यात आली.
- राज्यांतील लोकसभा आणि विधानसभा मतदारसंघातील क्षेत्रांची पुर्नअखणी आणि पुनर्रचना 1991 मधील जनगणनेच्या आधारे करण्यास परवानगी देण्यात आली.

### ❋ 85 वी घटनादुरुस्ती अधिनियम – 2001

- अनुसुचित जाती व अनुसुचित जमातीतील सरकारी कर्मचाऱ्यांना 17 जुन 1995 अशा पूर्वलक्षी प्रभावाने पद्दोन्नतीसाठी सेवाजेष्टता देण्याची तरतूद करण्यात आली. (कलम–16 (4A) मध्ये दुरुस्ती)

### ❋ 86 वी घटनादुरुस्ती अधिनियम – 2002

- मार्गदर्शक तत्व कलम–45 मध्ये सुधारणा करण्यता आली.
- शिक्षणाच्या अधिकारासंबंधी कलम–21 A हे नवीन कलम घटनेत समाविष्ट करण्यात आले.
- भाग–4 A मधील कलम–51 A मध्ये 11 वे कर्तव्य समाविष्ट करण्यात आले.

### ❋ 87 वी घटनादुरुस्ती अधिनियम – 2003

- 1991 ऐवजी 2001 च्या जनगणनेच्या आधारावर राज्यातील लोकसभा व विधानसभा मतदारसंघाची पुनर्आखणी व पुनर्रचना करण्याची तरतूद करण्यात आली.

SAMADHAN KOKATE (POLITY)

## ❋ 88 वी घटनादुरुस्ती अधिनियम – 2003

➢ सेवा कर (कलम–268 A) ची तरतूद करण्यात आली.

(101 वी घटनादुरुस्ती 2016 अन्वये 268 A हे कलम वगळण्यात आले आहे.)

➢ परिशिष्ट 7 मध्ये विषय क्रमांक 92 (C) सेवांवरील कर समाविष्ट करण्यात आला.

## ❋ 89 वी घटनादुरुस्ती अधिनियम – 2003

➢ अगोदरच्या राष्ट्रीय अनसुचित जाती व अनुसुचित जमाती आयोगाचे भाग पाडून राष्ट्रीय अनुसुचित जाती आयोग (कलम–338) व राष्ट्रीय अनुसूचित जमाती आयोग (कलम–338 A) असे दोन स्वतंत्र आयोग स्थापन करण्यात आले.

➢ या दोन्ही आयोगांना दिवाणी न्यायालयासमान अधिकार असतील.

## ❋ 90 वी घटनादुरुस्ती अधिनियम – 2003

➢ आसामबाबत विशेष तरतुदी, कलम–332(6)

## ❋ 91 वी घटनादुरुस्ती अधिनियम – 2003

➢ केंद्रीय मंत्रीमंडळाचा आकार पंतप्रधानासह लोकसभेच्या एकुण सदस्यसंख्येच्या 15% पेक्षा अधिक असणार नाही. (कलम–75(1A)

➢ संसदेचा सदस्य पक्षांतरामुळे अपात्र ठरल्यास तो मंत्रीपदावर नियुक्तीसाठीही अपात्र ठरेल. (कलम–75(1B)

➢ राज्यमंत्रीमंडळाची संख्या मुख्यमंत्र्यासह राज्याच्या विधानसभेच्या एकुण सदस्यसंख्येच्या 15% पेक्षा अधिक आणि 12 पेक्षा कमी नसावी (कलम–164(1A)

➢ राज्यविधिमंडळातील पक्षातील 1/3 सदस्यांची पक्षांतर केल्यास परिशिष्ट 10 नुसार असणारे संरक्षण आता कढून टाकण्यात आले.

➢ राज्यविधिमंडळाचा सदस्य पक्षांतरामुळे अपात्र ठरल्यास तो मंत्रीपदावर नियुक्तीसाठीही अपात्र ठरतो. (कलम–164(1B)

## ❋ 92 वी घटनादुरुस्ती अधिनियम – 2003

➢ परिशिष्ट 8 मध्ये 4 नवीन भाषांचा समावेश – बोडो, डोंगरी, मैथिली व संथाली.

## ❋ 93 वी घटनादुरुस्ती अधिनियम – 2005

➢ कलम–15 (5) समाविष्ट करुन (अल्पसंख्यांक शैक्षणिक संस्था वगळता) सर्व शैक्षणिक संस्थामध्ये सामाजिक किंवा शैक्षणिक मागासवर्गीय, SC व ST यांच्यासाठी विशेष तरतुदी करण्याचा अधिकार राज्याला देण्यात आला.

## ❋ 94 वी घटनादुरुस्ती अधिनियम – 2006

➢ ''आदिवासी कल्याणमंत्री'' असावयासच हवा ही बिहार राज्यातील तरतूद रद्द करून वरील तरतूद छत्तीसगड व झारखंड राज्याला लागू करण्यात आली. कलम–164(1)

➢ सध्या ''आदिवासी कल्याणमंत्री असावयासच हवा'' अशी तरतूद मध्यप्रदेश, ओडिशा, झारखंड व छत्तीसगड या राज्यांबाबत लागू आहे.

## ❋ 95 वी घटनादुरुस्ती अधिनियम – 2009

➢ कलम–334 मध्ये दुरुस्ती करुन अनुसूचित जमाती आणि अँग्लो इंडियन यांच्या जागा आरक्षण कालावधीत 10 वर्षांनी वाढ करण्यात येऊन तो 2020 पर्यंत वाढवण्यात आला.

## ❋ 96 वी घटनादुरुस्ती अधिनियम – 2011

➢ ओरिया ऐवजी उडिया असा उच्चार बदल करण्यात आला. (परिशिष्ट 8 मधील भाषा क्रमांक 15)

## ❋ 97 वी घटनादुरुस्ती अधिनियम – 2011

➢ सहकारी संस्था स्थापन करणे हा मुलभूत हक्क ठरविण्यात आला. (कलम–19(1C) नव्याने समाविष्ट.

SAMADHAN KOKATE (POLITY)

- राज्याने सहकारी संस्थांना प्रोत्साहन देणे. (मार्गदर्शकतत्व 43(B))
- घटनेमध्ये "सहकारी संस्था" या शिर्षकाचा एक नवीन भाग 9B समाविष्ट करण्यात आला.

## ✻ 98 वी घटनादुरुस्ती अधिनियम – 2012

- कर्नाटक राज्यातील कर्नाटक – हैद्राबाद क्षेत्रासाठी विशेष तरतुदी करण्यात आल्या. (कलम–371J)

## ✻ 99 वी घटनादुरुस्ती अधिनियम – 2014

- सर्वोच्च न्यायालयाच्या न्यायाधिशांच्या नियुक्तीसाठीची कॉलेजियम पद्धत रद्द करुन त्याऐवजी 'राष्ट्रीय न्यायिक आयोगाची' स्थापना करण्याची तरतूद करण्यता आली.
- याद्वारे संविधानात कलम–124A, 124B, आणि 124C ही नवीन कलमे समाविष्ट करण्यात आली.
- याद्वारे घटनेतील पुढील कलमात दुरुस्त्या करण्यात आल्या कलम–124, 127, 128, 217, 222, 224, 224A आणि 231
- सन 2015 मध्ये सर्वोच्च न्यायालयाने ही घटनादुरुस्ती घटनाबाह्य ठरवून रद्द केली. (कलम 50 च्या आधारे)

## ✻ 100 वी घटनादुरुस्ती अधिनियम – 2015

- यासाठी 119 वे घटनादुरुस्ती विधेयक मांडले गेले.
- भारत बांग्लादेश भूमी सीमा करार. 1974 आणि 2011 मधील प्रोटोकॉलची अंमलबजावणी करण्यासाठी ही घटनादुरुस्ती करण्यता आली.

## ✻ 101 वी घटनादुरुस्ती अधिनियम – 2016

- यासाठी 122 वे घटनादुरुस्ती विधेयक मांडले गेले.
- या घटनादुरुस्ती अन्वये घटनेमध्ये 'वस्तू व सेवाकर' (GST) ची तरतूद करण्यात आली.
- यासाठी पुढील कलमात दुरुस्त्या करण्यात आल्या आहेत.
  (कलम–246, 248, 249, 250, 268, 269, 270, 271, 286, 366 आणि 368)
- 246–A हे कलम नव्याने समाविष्ट करण्यात येऊन याद्वारे संसद आणि राज्य राज्यविधानमंडळाला GST लागू करण्यासाठी कायदे करण्याचे अधिकार देण्यात आले.
- घटनेत पुढील कलमांचा नव्याने समावेश करण्यात आला. कलम–269A, 279A
- याद्वारे संविधानातील कलम–268 A रद्द करण्यात आले.
- तसेच केंद्रसुचीतील विषय क्रमांक 92 आणि 92 C तसेच राज्यसुचीतील विषय क्रमांक 52 आणि 55 रद्द करण्यात आले.

## ✻ 102 वी घटनादुरुस्ती अधिनियम – 2018

- यासाठी 123 वे घटनादुरुस्ती विधेयक मांडण्यात आले होते.
- या घटनादुरुस्ती अन्वये "राष्ट्रीय मागास वर्ग आयोगाला" (NCBC) घटनात्मक दर्जा देण्यात आला.
- यापुर्वी आयोगाला वैधानिक आयोगाचा दर्जा होता. (राष्ट्रीय मागासवर्ग आयोग कायदा 1993)
- घटनेत पुढील 2 नव्या कलमांचा समावेश कलम–338(B) व 342(A)
- आयोगाचे सध्याचे अध्यक्ष – भगवानलाल साहनी.

**महत्वाचे :**

- कलम–338 : राष्ट्रीय अनुसुचीत जाती आयोग (SC)
- कलम–338A : राष्ट्रीय अनुसुचीत जमाती आयोग (ST)
- कलम–338B : राष्ट्रीय मागासवर्ग आयोग (OBC)
- राष्ट्रीय मागासवर्ग आयोग हा इंद्रा साहनी वि.भारतीय संघ या खटल्याचा परिणाम आहे.

## ✻ 103 वी घटनादुरुस्ती अधिनियम – 2019

- राष्ट्रपतींची मंजुरी : 12 जानेवारी 2019
- अंमलबजावणी : 14 जानेवारी 2019
- घटनादुरुस्ती विधेयक क्रमांक : 124 वे

SAMADHAN KOKATE (POLITY)

- या घटनादुरुस्तीने 'आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटनांना' 10% आरक्षण देण्यात आले.
- आर्थिक दृष्ट्या दुर्बलांना दिले गेलेले 10% आरक्षण अनुसुचित जाती व अनुसूचीत जमाती व अन्य मागासवर्गीय समुहांना दिल्या जाणाऱ्या आरक्षणाहुन वेगळ्या असेल.
- आर्थिक दृष्ट्या दुर्बलांना 10% आरक्षणाचा लाभ देण्यासाठीचे आर्थिक निकष ठरविण्याचे अधिकार राज्यांना प्रधान करण्यात आले आहे.
- या कायद्यामुळे मार्गदर्शक तत्वे कलम-46 ला मुर्त स्वरूप प्राप्त.
- या दुरुस्तीने घटनेमध्ये कलम-15(6) आणि कलम-16(6) ही दोन उपकलमे जोडण्यात आली.
- आरक्षणाची अंमलबजावणी करणारे पहिले तीन राज्य
  1) गुजरात 2) झारखंड
  3) उत्तरप्रदेश

✼ महाराष्ट्र शासनाकडून 4 फेब्रुवारी 2019 अंमलबजावणी

- युथ फॉर इक्वालिटी आणि कौशलकांत मिश्रा यांच्याकडून 103 व्या घटनादुरुस्ती विरोधात सर्वोच्च न्यायालयात याचिका दाखल करण्यात आली आहे.

## ✼ 104 वी घटनादुरुस्ती अधिनियम - 2020

- लोकसभा पारित : 10 डिसेंबर 2019,
- राज्यसभा पारित : 12 डिसेंबर 2019
- राष्ट्रपतीची मंजूरी : 21 जानेवारी 2020
- अंमलबजावणी : 25 जानेवारी 2020
- घटनादुरुस्ती विधेयक क्रमांक-126 वे
- या घटनादुरुस्तीद्वारे लोकसभा आणि राज्यविधानसभांमध्ये अनुसुचित जाती व अनुसुचीत जमातींसाठी जागांच्या आरक्षणाचा कालावधी आणखी 10 वर्षांनी म्हणजेच 25 जानेवारी 2030 पर्यंत वाढवण्यात आला आहे.
- यासाठी घटनेच्या कलम 334 मध्ये दुरुस्ती करण्यात आली.
- तसेच या घटनादुरुस्तीने अँग्लो इंडियन समुदायासाठी (लोकसभेत दोन तर विधानसभेत 1) नामनिर्देशनाच्या स्वरुपातील आरक्षित जागा मात्र रद्द करण्यात आल्या आहेत.

✼ **लोकसभेतील अखेरचे नामनिर्देशित आंग्ल भारतीय सदस्य :**

- जॉर्ज बेकर (भाजप) : पश्चिम बंगाल
- प्रा.रिचर्ड (भाजप) : केरळ.

✼ **महाराष्ट्र विधानसभेतील अखेरचे नामनिर्देशित आंग्ल भारतीय सदस्य :**

- डेसमंड नॉर्मन येट्स : मे 2018 मध्ये त्यांना विधानसभा सदस्यपदी शपथ देण्यात आली होती.

✼ **प्रथम लोकसभेतील नामनिर्देशित आंग्ल भारतीय सदस्य :**

- फ्रॅंक अँथनी (8 वेळा लोकसभा सदस्य, ICSE बोर्डचे संस्थापक)
- अल्बर्ट अर्नेस्ट थॉमस बरो.

**कलम 334 :**

- शिर्षक : राखीव जागा व विशेष प्रतिनिधित्व सत्तर वर्षानंतर समाप्त होणे.
- 334 (a) : लोकसभा व विधानसभांमध्ये SC व ST साठी जागांचे आरक्षण
- 334 (b) : लोकसभा आणि राज्यांच्या विधानसभांमध्ये अँग्लो-इंडियन यांना नामनिर्देशन द्वारे प्रतिनिधित्व.
- पुढील घटनादुरुस्तीद्वारे 334 मधील तरतुदीना प्रत्येक वेळी 10-10 वर्षांनी मुदतवाढ देण्यात आली.
  1) 8 वी घटनादुरुस्ती (1960)
  2) 23 वी घटनादुरुस्ती (1969)
  3) 45 वी घटनादुरुस्ती (1980)
  4) 62 वी घटनादुरुस्ती (1989)
  5) 79 वी घटनादुरुस्ती (1999)
  6) 95 वी घटनादुरुस्ती (2009)
  7) 104 वी घटनादुरुस्ती (2020)
  (आरक्षण मर्यादा- 25 जानेवारी 2030)

टिप : 104 व्या घटनादुरुस्तीने SC व ST साठी जागांच्या आरक्षणाला मुदतवाढ दिली तर अँग्लो इंडियन यांचे नामनिर्देशित प्रतिनिधित्व रद्द केले.

**महत्त्वाचे :**

| अ.क्र. | समुदाय | लोकसभा (एकूण) | विधानसभा (एकूण) |
|---|---|---|---|
| 1) | अनु. जाती | 84 | 614 |
| 2) | अनु.जमाती | 47 | 554 |

**महाराष्ट्र**

| समुदाय | लोकसभा | विधानसभा |
|---|---|---|
| अनु. जाती | 5 | 29 |
| अनु. जमाती | 4 | 25 |

**अनुसुचित जाती राखीव मतदार संघ :**

1) अमरावती
2) रामटेक
3) शिर्डी
4) लातूर
5) सोलापूर

**अनुसुचित जमाती राखीव मतदार संघ :**

1) नंदुरबार
2) गडचिरोली–चिमुर
3) दिंडोरी
4) पालघर

✻ **125 वे घटनादुरुस्ती विधेयक – 2019**

**उद्देश्य :**

➢ भारताच्या पूर्वोत्तर क्षेत्रांमध्ये घटनेच्या सहाव्या अनुसुचीतील स्वायत्त परिषदांच्या वित्तीय आणि कार्यकारी अधिकारांमध्ये वाढ करणे.

✻✻✻✻



# घटनेतील भाग व समाविष्ट कलमे

| भाग | विषय | समाविष्ट कलमे |
|---|---|---|
| 1 | संघ व त्यातील भूप्रदेश | कलम 1 ते 4 |
| 2 | नागरिकत्व | कलम 5 ते 11 |
| 3 | मूलभूत हक्क | कलम 12 ते 35 |
| 4 | मार्गदर्शक तत्त्वे | कलम 36 ते 51 |
| 4 (A) | मूलभूत कर्तव्य | कलम 51 (A) |
| 5 | केंद्र सरकार | कलम 51 व 151 |
| 6 | राज्य सरकार | कलम 152 ते 237 |
| 7 | रद्द | 7 वी घटना दुरूस्ती 1956 |
| 8 | केंद्रशासित प्रदेश | कलम 239 ते 242 |
| 9 | पंचायती | कलम 243 ते 243 (O) |
| 9 (A) | नगरपालिका | कलम 243 (P) ते 243 (ZG) |
| 9 (B) | सहकारी संस्था | कलम 243 (ZH) ते 243(ZT) |
| 10 | अनुसुचित व आदिवासी | कलम 244 ते 244 (A) |
| 11 | केंद्र राज्य संबंध | कलम 245 ते 263 |
| 12 | वित्त मालमत्ता संविदा दावे | कलम 264 ते 300 (A) |
| 13 | भारताच्या व्यापार, वाणिज्य | कलम 301 ते 307 |
| 14 | केंद्र आणि राज्यअंतर्गतसेवा | कलम 308 ते 323 |
| 14(A) | न्यायाधिकरणे | कलम 323 (A) व 323(B) |
| 15 | निवडणूका | कलम 324 ते 329 (A) |
| 16 | विशेष वर्गासाठी वि.तरतूदे | कलम 330 ते 342 |
| 16 | विशेष वर्गासाठी वि.तरतूदे | कलम 330 ते 342 |
| 17 | राजभाषा | कलम 343 ते 351 |
| 18 | आणीबाणी संबंधी तरतुदी | कलम 352 ते 360 |
| 19 | संकिर्ण | कलम 361 ते 367 |
| 20 | 20 वी घटनादुरूस्ती | कलम 368 |
| 21 | अस्थायी, संक्रमणशील व विशेष तरतुदी | कलम 369 ते 392 |
| 22 | संक्षिप्त नाव, प्रारंभ, प्राधिकृत हिंदी पाठ व निरसने | कलम 393 ते 395 |

## घटनेत समाविष्ट नविन भाग

| | |
|---|---|
| भाग –7 | 7 वी घटनादुरूस्ती 1956 अन्वये वगळण्यात आला. |
| भाग –4 (A) | 42 वी घटनादुरूस्ती 1976 अन्वये घटनेत समाविष्ठ. |
| भाग –9 (A) | 74 वी घटनादुरूस्ती 1992 अन्वये घटनेत समाविष्ठ. |
| भाग –9 (B) | 97 वी घटनादुरूस्ती 2011 अन्वये घटनेत समाविष्ठ. |
| भाग –14 (A) | 42 वी घटनादुरूस्ती 1976 अन्वये घटनेत समाविष्ठ. |

## अनुसूची क्रमांक व विषय

| | |
|---|---|
| पहिली अनुसूची | राज्य व केंद्रशासित प्रदेशांची नाव व त्यांचे राज्यक्षेत्र |
| दुसरी अनुसूची | वित्तलब्धी, भत्ते व विशेषाधिकार |
| तिसरी अनुसूची | शपथ किंवा प्रतिज्ञ |
| चौथी अनुसूची | राज्य व केंद्रशासित प्रदेशांच्या राज्यसभेतील जागा |
| पाचवी अनुसूची | अनुसूचितक्षेत्रे व अनुसूचित जमातीचे प्रशासन |
| सातवी अनुसूची | संघ, राज्य व समवर्ती सूची |
| आठवी अनुसूची | मान्यताप्राप्त भाषा |
| नववी अनुसूची | विधीग्राह्य कायदे व विनियमने (1 ली घटनादुरूस्ती 1951) |
| दहावी अनुसूची | पक्षांतराच्या कारणावरून अपात्रता (52 वी घटनादुरूस्ती 1985) |
| आकरावीअनुसूची | पंचायतीचे अधिकार, प्राधिकार जबाबदाऱ्या (73 वी घटनादुरूस्ती 1992) |
| बारावी अनुसूची | नगरपालिकाचे अधिकार, प्राधिकार जबाबदाऱ्या (74 वी घटनादुरूस्ती 1992) |

मार्गदर्शक : **समाधान कोकाटे सर** (M.A.Pol.Sci.)
अतिरिक्त नोट्ससाठी Telegram Channel @polity194 Join करा.
* संपर्क * 9511652856